Prerna Sewa Mandal's

# PRERNA COLLEGE OF COMMERCE


Reshimbag Square, Nagpur - 440024

## 'माणसामध्ये' परिवर्तन' ही वृत्ती जर असेल तर निश्चितच समाज बदलेल , गाव बदलेल , देश बदलेल.' डॉ. बाळ पदवाड

प्रेरणा वाणिज्य महाविद्यालयामध्ये भाषा विभागाच्या वतीने दि. १० नोव्हेंबर २०२० रोजी सकाळी १०:०० वाजता विद्यार्थ्यांसाठी' राष्टसंत तुकडोजी महाराजांची ग्राम विकासाबद्दलची संकल्पना ' या विषयावर ऑनलाईन मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.प्रस्तुत कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक, प्रसिद्ध कवी,लेखक,समाजसेवक डॉ. बाळ पदवाड,सेवानिवृत्त प्राध्यापक, जी.एस. कॉमर्स कॉलेज, नागपूर हे होते.

या कार्यक्रमाचे प्रास्तावीक प्रेरणा वाणिज्य महाविद्यालयाचे संचालक, डॉ. प्रविण जोशी यांनी केले. ' राष्टसंत तुकडोजी महाराजांची ग्राम विकासाबद्दलची संकल्पना ' या विषयावर डॉ. बाळ पदवाड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना म्हटले की, " ग्राम ' स्वायत्त ' होण्यासाठी सर्व धर्म समभाव, समानता, एकात्मता जोपासने महत्वाचे आहे.तसेच कुटुंबधर्म, शेजारधर्म, गावधर्म यातूनच आपण ग्राम विकास घडवून आणू शकतो आणि राष्टसंत तूकडोजी महाराजांची ग्राम विकासाबद्दलची संकल्पना विकसीत करू शकतो. "

या कार्यक्रमामध्ये डॉ. बाळ पदवाड यांचे मौलिक मार्गदर्शन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त असे होते. या कार्यक्रमामध्ये ३००विद्यार्थ्यांनी सहभाग दर्शविला. कार्यक्रमाचे संचालन आणि आभार प्रदर्शन प्रा. वैशाली भगत यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रेरणा वाणिज्य महाविद्यालयाचे संचालक डॉ. प्रविण जोशी, कार्यकारी प्राचार्या डॉ. भारती देशमूख आणि भाषा विभाग प्रमूख प्रा. स्नेहल राखूंडे यांनी विशेष मार्गदर्शन केले. तसेच प्रा. प्रशांत सेलोकार, प्रा. रोशनी नायक, प्रा. वैशाली भगत, सर्व प्राध्यापक वृंद आणि टेक्निशयन यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अविरत परिश्रम घेतले.




डॉ. बाळ पदवाड यांचे मौलिक मार्गदर्शन

Vaisali Bhagat
Programme Co-ordinator
Prerna College of Commerce